# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

शंकरराव चौक, कल्याण (प), जि.ठाणे. पिन–४२१ ३०१

विभाग : सामान्य प्रशासन मुख्यालय

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

## —: कोव्हिड–१९ प्रतिबंध अंतर्गत कंत्राटी भरती जाहिरात :—

## —: थेट मुलाखती (Walk in Interview) :—

कोरोना विषाणूंचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका रुग्णालयीन सेवेसाठी खालीलप्रमाणे पदांसाठी निव्वळ मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने प्रथमत: तीन महिने कालावधीसाठी नेमणूक करणेकामी दि.२३/१०/२०२० ( शुक्रवार) रोजी पात्र उमेदवारांच्या थेट मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | बायोमेडीकल इंजिनियर | २ | Degree / Diploma in Biomedical Engineer. ( Degree preferrable ) | रु.४००००/– (रु.चाळीस हजार मात्र) |
| २ | मानसोपचार तज्ञ | १ | M.D. / DPM. Psychiatry. | रु.८५०००/– (रु.पंच्याऐंशी हजार मात्र) |
| ३ | मानसोपचार समुपदेशक | २ | M.A. Clinical Psychology **OR** M.A. Councelling Psychology ( Preference will be given if REBT / CBT Course done ) | रु.२५०००/– (रु.पंचवीस हजार मात्र) |

| | | |
|---|---|---|
| अ) | मुलाखतीचे ठिकाण — | आयुक्त कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, शंकरराव चौक, कल्याण (प.) |
| ब) | थेट मुलाखतीचा दिनांक — | दि.२३/१०/२०२० ( शुक्रवार) |
| क) | उमेदवारांची नोंदणी आणि कागदपत्रे छाननी व तपासणी — | सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत. |
| ड) | थेट मुलाखतीची वेळ — | दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील |

**( टिप:— पदसंख्येपेक्षा कमी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास मुलाखती न घेता नियुक्ती देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल )**

सर्वसाधारण अटी व शर्ती :—

(१) वयोमर्यादा :— मुलाखतीच्या दिनांकास किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीयांकरितां ४३ वर्षे राहील. विहित वयोमर्यादितील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर अट शिथिल करण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.

(२) सदरची नियुक्ती ही कंत्राटी पध्दतीने पूर्णपणे तातपुरत्या/अस्थायी स्वरुपाची व कोव्हिड–१९ साथरोग कालावधीसाठी आहे. साथरोगाचा प्रादूर्भाव संपल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. त्यापुढे त्यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.

(३) उमेदवारांनी संपूर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पूर्ण स्पष्ट पत्ता, भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रमांक, मेल आयडी, जन्मतारीख, वय, धारण शैक्षणिक अर्हता, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव इत्यादी तपशिल कॉलमनिहाय स्पष्ट व स्वच्छ अक्षरात अथवा टंकलिखित स्वरुपातील अर्ज प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस सादर करावयाचा आहे. (सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.)
मुलाखतीस येताना उमेदवाराने त्याचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र/वैधता प्रमाणपत्र, जन्मतारखेचे प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादी मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. तसेच त्यांचा एक संच झेरॉक्स प्रतीचा अर्जासोबत जोडावा. मुलाखतीच्या वेळी मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध न करुन दिल्यास मुलाखत घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(४) वरीलप्रमाणे पदांसाठी यापुर्वी उमेदवारांनी अर्ज केले असल्यास अशा उमेदवारांनी सुध्दा सदरहू जाहिरातीप्रमाणे विहित पुर्तता करुन प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावयाचे आहे. तसेच थेट मुलाखतीस उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

(५) उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा. तसेच उमेदवार विवाहीत महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नावात बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(६) उमेदवारास नियुक्ती दिल्यास त्याने २४ तासात कामावर हजर होणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी लागू करण्यांत येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबंधितांना लागू राहतील.

(७) नियुक्तीनंतर सेवा सोडणेसंदर्भात एक महिना पुर्वसूचना न देता परस्पर सेवा सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल

(८) संबंधितांवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल असल्यास अथवा झाल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच नियुक्ती कालावधीत संबंधितांचे काम समाधानकारक नसल्यास, तसेच शासकीय कर्मचाऱ्यास अशोभनिय/ महानगरपालिकेचा विश्वास गमावणारे वर्तन केल्यास उमेदवारांना कोणतेही कारण वा नोटीस न देता, कोणत्याही टप्प्यावर त्यांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार आयुक्त, क.डों.म.पा., कल्याण यांना राहतील.

सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना **www.kdmc.gov.in** या वेबसाईटवर प्रसिध्द आहे.

( डॉ.विजय सूर्यवंशी ) भा.प्र.से.
आयुक्त,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## कंत्राटी पध्दतीने कोव्हिड–१९ प्रतिबंध अंतर्गत भरती

प्रति,
मा.आयुक्त,
कल्याण डोबिवली महानगरपालिका,
कल्याण.

उमेदवाराचा फोटो

**विषय :– "______________________" पदासाठी अर्ज.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मी कंत्राटी पध्दतीने नियुक्तीकामी "________________" या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून, सदर पदासाठी निवड होण्यासाठी सदरहू अर्ज सादर करीत आहे.

**१) संपूर्ण नांव** : ____________________________________________

**२) पत्रव्यवहाराचा पत्ता** : ____________________________________________

____________________________________________

ता.__________ जि.____________ पिन ____________

**३) ई–मेल आय.डी.** : ________________________ मोबाईल क्र. __________

**४) जन्मदिनांक** : ____________ ( आजरोजीचे वय ____ वर्षे, _____ महिने )

**५) लिंग** : पुरुष / स्त्री

**६) जात** : __________

( S.C. / S.T. / V.J.(A) / N.T. (B) / N.T. (C) / N.T. (D) / OBC / S.B.C. / OPEN )

**७) शैक्षणिक अर्हता :**

| अक्र | शैक्षणिक अर्हता | विद्यापिठ/बोर्ड/संस्थेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | परिक्षेचे एकूण गुण | परिक्षेत प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**८) अनुभवाचा तपशिल :**

| अक्र | संस्थेचे नाव व पत्ता | पद | कार्यरत कालावधी | | एकूण कालावधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**९) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र क्र.:** __________ **दिनांक :** ________ **प्रमाणपत्र वैधतेचा दिनांक :** ________

वर नमूद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, माझेविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसून, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे कंत्राटी भरतीच्या नोकरीवरुन कमी करण्यास पात्र राहील व त्याबात माझेविरुध्द कायदेशिर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

| अक्र | कागदपत्रे | जोडले आहे | जोडले नाही |
|---|---|---|---|
| १ | जन्मदिनांक पुरावा | | |
| २ | जात प्रमाणपत्र | | |
| ३ | शैक्षणिक अर्हता | | |
| ४ | अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र | | |

| अक्र | कागदपत्रे | जोडले आहे | जोडले नाही |
|---|---|---|---|
| ५ | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | | |
| ६ | अनुभव प्रमाणपत्र | | |
| ७ | ओळखपत्र | | |
| | | | |

ठिकाण : कल्याण

अर्जदाराची सही : ______________

दिनाक : /१०/२०२०

( नांव : ______________ )

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
## कार्यालयीन तपासणी

उमेदवाराचे नांव : ------------------------------ पदनाम : -------------------------

उपरोक्त उमेदवाराने सादर केलेली कागदपत्रे तपासली असून, उमेदवार हा मुलाखतीस **पात्र** आहे.

सही :

तपासणी अधिकाऱ्याचे नाव : -------------------
व पदनाम

दिनांक : /१०/२०२०

**किं वा**

उपरोक्त उमेदवाराने सादर केलेली कागदपत्रे तपासली असून, उमेदवार हा मुलाखतीस **अपात्र** आहे.

कारण -------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

सही :

तपासणी अधिकाऱ्याचे नाव : -------------------
व पदनाम

दिनांक : /१०/२०२०